महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
दूरध्वनी क्र ०२२-२२७९४१५०/२२०२ ४३३०. Email ID doesttclass1.wrd@maharashtra.gov.in

क्रमांक: एडीसी १२२२/ प्र.क्र.३५०/आ (वर्ग-१). दिनांक: १५.०४.२०२४

**विषय** : अधीक्षक अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन मंडळ, नागपूर या पदाच्या अतिरिक्त कार्यभाराबाबत.

**संदर्भ** : १) शासन आदेश, जलसंपदा विभाग, क्र. एडीसी -१२२२/(प्र.क्र.३५०/२०२२)/ आ (वर्ग-१), दिनांक ०९.०३.२०२३
२) शासन आदेश, जलसंपदा विभाग, क्र. एडीसी -१२२२/(प्र.क्र.३५०/२०२२)/ आ (वर्ग-१), दिनांक ०४.०५.२०२३
३) मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प यांचे कार्यालयाचे क्र.मुअ(वि)/ जविप्र/आ-२(१)/२२७५, दिनांक ०७.१२.२०२३ चे पत्र.

## शासन आदेश

अधीक्षक अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन मंडळ, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार संदर्भाधीन क्रमांक १ येथील आदेशान्वये श्री.प्रभाकर प्र.वानखेडे, कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तद्नंतर संदर्भाधिन क्रमांक २ येथील आदेशान्वये सदरहू पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.धनंजय दाहेदार, कार्यकारी अभियंता, नियंत्रण व तपासणी पथक, मुंबई यांच्याकडे सोपविण्यात आला होता. तथापि, दिनांक ०४.०५.२०२३ च्या आदेशाविरुध्द श्री.वानखेडे यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्रमांक ४५२/२०२३ मध्ये मा.न्यायाधिकरणाने दिनांक १३.०३.२०२४ रोजी खालीलप्रमाणे निर्णय देऊन मूळ अर्ज निकाली काढला आहे :-

***"The Impugned orders dated 04.05.2023/10.05.2023 are hereby quashed and set aside."***

परिणामी अधीक्षक अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन मंडळ, नागपूर या पदाचा अतिरिक्त श्री.वानखेडे, कार्यकारी अभियंता यांच्याकडे सोपविण्यात आलेला संदर्भाधीन आदेश क्र.१ सद्य:स्थितीत लागू आहे.

२.	सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दि.०५.०९.२०१८ मधील तरतूदीनुसार आता, प्रशासकीय कारणास्तव श्री.प्रभाकर प्र.वानखेडे, कार्यकारी अभियंता यांच्याकडील अधीक्षक अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन मंडळ, नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.रमेश दौ.खैरनार, कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे.

३.	श्री.रमेश दौ.खैरनार, कार्यकारी अभियंता यांनी स्वत:च्या पदाचा नियमित कार्यभार सांभाळून उपरोक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपर्यंत सांभाळावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**(राखी चव्हाण)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. अ.मु.स.(जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
२. सचिव (लाक्षेवि/प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
३. मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, जलसंपदा विभाग, मुंबई
४. श्री.रमेश दौ.खैरनार, कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला
५. श्री.प्रभाकर प्र.वानखेडे, कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, यवतमाळ
६. आ (वर्ग-१) कार्यासन संग्रहार्थ.